**प्रशासकीय व वित्तीय मान्यता**
**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना**
**२०१९-२०**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक गोमुशेअवि-२०१९/प्र.क्र.१९८ /११-अे,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख - ५ डिसेंबर, २०१९.

**संदर्भ :-** **१) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग, क्र. शेअवि-२०१८/प्र.क्र.१९३/११-अे, दि.३१.८.२०१९.**
**२) शासन परिपत्रक कृषि व पदुम विभाग, क्र.शेअवि-२०१८/प्र.क्र.१९३/११-अे, दि.१९.९.२०१९.**
**३) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेसंदर्भातील राज्यस्तरीय समितीच्या बैठकीचे इतिवृत्त दि. २.११.२०१९.**
**४) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग, क्र. पुनर्वि-२०१९/ प्र.क्र. ८४ (२) /१९ /२-अे, दि. ४.१२.२०१९.**

**प्रस्तावना :-**

राज्यात शेती व्यवसाय करतांना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणामुळे होणारे अपघात, यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढावतो किंवा काहीना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तिस तसेच त्याच्या कुटुंबातील सदस्यास झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस व त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी व शेतकऱ्याच्या कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले कोणताही १ सदस्य (आई-वडील, शेतकऱ्याची पती/पत्नी, मुलगा व अविवाहीत मुलगी यापैकी कोणतीही एक व्यक्ती) असे १० ते ७५ वयोगटातील एकुण २ जणांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबविण्यास संदर्भ क्र. (१) येथील शासन निर्णय मान्यता देण्यात आली आहे. सुधारीत स्वरुपातील गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबविण्यासाठी संदर्भ क्र. (२) येथील शासन परिपत्रकान्वये कार्यपद्धती व मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

सुधारीत स्वरुपातील गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राज्यामध्ये राबविण्यासाठी दि युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरंन्स कंपनी लि.या विमा कंपनीची व व जायका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा. लि. नागपूर या विमा सल्लागार कंपनीची स्पर्धात्मक ई-निविदेच्या माध्यमातून संदर्भ क्र. (३) नुसार निवड करण्यात आलेली आहे. त्यानूसार दि.८.१२.२०१९ ते दि. ७.१२.२०२० या कालावधीत योजना राबविण्यासाठी विमा कंपनी व विमा सल्लागार कंपनी यांची नियुक्ती करणे तसेच विमा हप्ता व विमा ब्रोकरेज निश्चित करण्याची आणि निधी वितरणाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सुधारीत स्वरूपातील "**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना** दि. ८.१२.२०१९ ते दि. ७.१२.२०२० या कालावधीत दि युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरंन्स कंपनी लि. या विमा कंपनीमार्फत प्रति शेतकरी प्रति वर्ष रु. ३२.२३ इतक्या विमा हप्ता दराने (विना ब्राकरेज) व जायका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा. लि. नागपूर या विमा सल्लागार कंपनीमार्फत ०.०८ टक्के इतका विमा ब्रोकरेज दराने राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २०१९-२० मध्ये विमा हप्ता रकमेचे विमा कंपनीला प्रदान झाल्यापासून १२ महिने इतक्या कालावधीकरीता राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी व त्यांच्या कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले सदस्य यांना विविध अपघातांपासून संरक्षण देण्यासाठी विमा कंपनीला व विमा सल्लागार कंपनीस अदा करावयाची विमा हप्ता रक्कम व विमा ब्रोकरेज रक्कम पुढील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विमा कंपनीचे नाव | शेतकरी / कुटुंबातील सदस्य | रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | दि युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरंन्स कंपनी लि. | ३.०४ कोटी | ९७,९७,९२,००० |
| २ | जायका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा. लि. | ३.०४ कोटी | ७,८३,८३४ |
| | एकूण | | ९८,०५,७५,८३४ |

३. विमा कंपनीस व विमा सल्लागार कंपनीस वरील तक्क्यात नमूद केल्याप्रमाणे १२ महिने कालावधी करीता होणारी एकूण विमा हप्ता व विमा ब्राकरेज रक्कम रु. ९८,०५,७५,८३४/- (रुपये अठ्ठयान्नव कोटी पाच लाख पंच्याहत्तर हजार आठशे चौतीस फक्त) मंजूर करुन वितरीत करण्यास सदर आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

४. सुधारीत "गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना" शासन निर्णय दि.३१ ऑगस्ट, २०१९ व दि. १९ सप्टेंबर,२०१९ मध्ये नूमद तरतूदी व अटींनुसार राबविण्याची जबाबदारी आयुक्त (कृषी) यांची राहील.

५. यावरील खर्च खाली नमूद लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० करीता मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

**मागणी क्रमांक डी-३,**
**२४०१-पीक संवर्धन,**
**११०-पीक विमा,**
**(००) (०६) गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना (कार्यक्रम) (२४०१ ४४२७),**
**३३ - अर्थसहाय्य"**

६. प्रस्तुत प्रयोजनासाठी आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी, तसेच, सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक २७२/२०१९/व्यय-१, दि.२०.११.२०१९ व क्र.३०४/२०१९/व्यय-१, दि. ४.१२.२०१९ अन्वये दिलेल्या सहतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०१९१२०५१६५९४३४९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( निता शिंदे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
३. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
४. सर्व मा.विधानसभा सदस्य
५. सर्व मा. विधानपरिषद सदस्य
६. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय,मुंबई ३२
७. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुमविभाग, मंत्रालय, मुंबई ३२
८. अपर मुख्य सचिव (महसूल ), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई ३२
९. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१२. प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा), गृहविभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती ) प्रसिध्दीच्या विनंतीसह
१५. सर्व विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर)
१६. आयुक्त (कृषि), कृषिआयुक्तालय, महाराष्ट्रराज्य, पुणे
१७. सर्व जिल्हाधिकारी
१८. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्रराज्य, पुणे
१९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
२०. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

२१. सर्व जिल्हा परिषदांचे, जिल्हा कृषि विकास अधिकारी
२२. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा), मुंबई.
२३. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, ( लेखावअनुज्ञेयता), मुंबई
२४. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा), नागपूर
२५. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखावअनुज्ञेयता),नागपूर
२६. संचालक, लेखावकोषागारे, मुंबई
२७. अधिदानवलेखाधिकारी, मुंबई
२८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
२९. ग्रंथालय प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
३०. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्रराज्य, पुणे-
३१. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्रराज्य, पुणे
३२. सर्व तहसिलदार
३३. सर्व उप विभागीय कृषि अधिकारी
३४. सर्व तालुका कृषिअधिकारी
३५. सर्व उपसचिव /अवर सचिव / कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३६. सर्व मंत्रालयीन विभाग
३७. सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्ष यांची मध्यवर्ती कार्यालये
३८. जायका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा.लि., २ रा मजला, जायका बिल्डींग, कमर्शियल रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
३९. दि युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरंन्स कंपनी लि. प्लॉट क्र. ईएल९९४/केएलसी टॉवर, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई-४००७१०.
४०. निवडनस्ती, कार्यासन ११-अे